# KrishiKatta Service Center

*For a Sustainable Future..*







कृषी कट्टा

An Initiative by the:

**MahaOrganic Farmer Producer Company**

# कृषी कट्टा

## कृषी कट्टा म्हणजे काय? (KrishiKatta Service Centre)

कृषी कट्टा - सेवा केंद्र (Service Centre) हे महाऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनीने विकसित केलेले ग्रामीण विकास केंद्र आहे. प्रत्येक गावामध्ये एखादा पार किंवा कट्टा असतो, जिथे संध्याकाळी किंवा निवांत वेळी गावातली लोक एकत्र बसतात, दिवसभरातल्या बऱ्या वाईट गोष्टींबद्दल, खेळी मेळीच्या वातावरणात गप्पा गोष्टी व देवाणघेवाण होते.
याचीच प्रतिकृती म्हणून महाऑरगॅनिकने कृषी कट्टा ही संकल्पना विकसित केली आहे. कृषी कट्टा सेवा केंद्रातून शेती विषयक व शेतीपूरक माहिती व दर्जेदार जैविक उत्पादने पुरवण्याचा उद्देश कंपनी साकार करणार आहे.

## सध्याची परिस्थिती

- ❊ शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती मिळवण्यासाठी गावातील खतं-औषधांचे दुकानं (कृषी सेवा केंद्र) हे सोईस्कर पर्याय असतो.
- ❊ बऱ्याच वेळेला कृषी केंद्र चालकांना शेती विषयक तांत्रिक माहिती, पिकांबद्दल समग्र (holistic) ज्ञान याचा अभाव असतो.
- ❊ शेती निविष्ठा विक्री करणे या उद्देशानेच काम चालत असल्याने शेतकऱ्याला नेमकी कशाची गरज आहे याकडे कोणाचच फार लक्ष नसतं.
- ❊ परिणामी शेतकऱ्याला योग्य सल्ला तर मिळत नाहीच पण अकारण खर्च वाढून शेती परवडेनाशी होते.
- ❊ योग्य ती माहिती न मिळाल्याने जास्तीचे/चुकीची खतं व औषधं वापरल्याने जमिनीचा पोत, पर्यावरणाचा ऱ्हास होतो ही गोष्ट वेगळीच.
- ❊ सद्य परिस्थिती बघता, पर्यावरणपूरक शाश्वत शेती शिवाय पर्याय नाही.
- ❊ शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक शाश्वत शेती बद्दल योग्य माहिती देणे, सल्ला देणे ही मोठी गरज आहे.

## कृषी कट्टा सेवा केंद्राची विशेषता

❊ केवळ निविष्ठा विक्री करणे हा उद्देश नसून शेतकऱ्यांची समृद्धी या विचाराने कामकाज.
❊ शाश्वत शेतीसाठी लागणारी सर्व योग्य शास्त्रोक्त माहिती, नवीन तंत्रज्ञान व निविष्ठा मिळण्याचे एकमेव ठिकाण.

❊ सल्ला व माहिती देण्यासाठी कृषी केंद्रावरती तज्ञ सेवावर्गाची नियुक्ती..
❊ नामांकित व दर्जेदार उत्पादने/निविष्ठा यांची योग्य दरात उपलब्धता.

❊ शेतीपूरक दर्जेदार उत्पादने, माती व पाणी परीक्षण, spray pumps, gloves, masks, Ph meter, moisture meter इत्यादी

❊ शाश्वत शेतीस लागणाऱ्या निविष्ठा- जैविक खतं, औषधं, सरळ वाण बियाणे, चिकट सापळे, काम गंध सापळे, नैसर्गिक प्रतिजैविके, संजीवके इत्यादी.

## कृषी कट्टा - Team

कृषी कट्टा सांभाळणारी टीम उच्चशिक्षित व अनुभवी अशी असून सर्व शेतकऱ्यांची मुले आहेत. केवळ ७/१२ (सातबारा)वरचे शेतकरी नसून यातील कित्येकांनी प्रत्यक्ष शेती केली असून शेतीतील प्रश्न, समस्या व संधी याचे त्यांना ज्ञान आहे. कृषी कट्टाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवी दिशा देण्याचे काम ही टीम करणार आहे. प्रामाणिकपणा, पारदर्शकता व सेवाभाव ही कृषी कट्टा संकल्पनेचे आधार स्तंभ असून हे मुद्दे रोजच्या व्यवहारात आणण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील राहणार आहेत.

## कृषी कट्टा – शेतकऱ्यांसाठी

* शेती व पिकांविषयी माहिती देणारा हक्काचा कट्टा
* खात्रीशीर व योग्य दरात जैविक खत, औषध व इतर निविष्ठा मिळण्याचं एकमेव ठिकाण
* सुशिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी
* शेतकरी गट (club) मार्फत दर महिन्याला तज्ञांकडून प्रशिक्षण, नवीन तंत्रज्ञानातील माहिती, चर्चासत्रे, शासनाच्या योजनांची व बँकांच्या, अर्थपुरवठ्याची माहिती तसेच अभ्यास दौरे, प्रदर्शन भेटींचे आयोजन, मुलाखती, शाश्वत शेतीबद्दल माहितीपट दाखवण्याचे नियोजन, पुस्तकांची उपलब्धता, इ.



## कृषी कट्टा – नेटवर्क पार्टनरसाठी (फ्रन्चाईजी / शेतकरी गट)



* कमी गुंतवणूकीतून शाश्वत परतावा मिळवून देण्यासाठी कृषी कट्टा सेवा केंद्र चालू करणे हा एक उत्तम पर्याय.
* नामांकित कंपन्यांच्या ब्रॅन्डच्या उत्पादनांचा योग्य दरात पुरवठा
* उत्पादनांबद्दल योग्य माहिती मिळवण्यासाठी तज्ञांकडून वेळोवेळी प्रशिक्षण
* कृषी केंद्रावरील कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षणांचे आयोजन
* व्यवसाय यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी जशा की संभाषण कला, मार्केटिंग, शेतकऱ्यांशी संवाद इत्यादींचं प्रशिक्षण
* आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी Tally, Billing, Stock inventory, Cash Handling, GST, Taxation या बद्दल तज्ञांकडून प्रशिक्षण व तत्पर सेवा
* यशस्वी उद्योजक होण्यासाठी लागणारे अखंड मार्गदर्शन व प्रशिक्षण

## कृषी कट्टा - निविष्ठा उत्पादकांसाठी (Manufacturers)

* आपल्या उत्पादनांना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची संधी.
* उत्पादनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी कट्टा सेवा केंद्र हे एक उत्तम माध्यम.
* कृषी कट्टा मार्फत घाऊक (bulk) प्रमाणात उत्पादने खरेदी केल्यामुळे पेमेंट रिकव्हरी करणे सोपे.
* सेल्स व मार्केटिंगवरील खर्चात बचत. स्टॉकिस्ट व डिस्ट्रीब्युटर्सची साखळी नसल्यामुळे जास्तीचा परतावा शेतकऱ्यांना व कंपनीला.



## उत्पादने/ निविष्ठा (खते, औषधे इ.)

पर्यावरण पूरक शाश्वत शेती हेच कृषी कट्टा चे ध्येय असल्याने कृत्रिम रासायनिक हानिकारक उत्पादनांना/ निविष्ठांना (खते, औषधे इ.) कृषी कट्टा सेवा केंद्रामध्ये प्रोत्साहन दिले जात नाही. किंबहुना जैविक, नैसर्गिक निविष्ठांनाच इथे स्थान आहे. विविध ब्रँडचे नाविन्यपूर्ण, दर्जेदार व परिणामकारक उत्पादने वाजवी दरात उपलब्ध आहेत.
साधारणपणे उत्पादनांचे/निविष्ठांचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

- जैविक खते
- जिवाणू खते
- हिरवळीची खते (बियाणे)
- जैविक संजीवके, प्रतिजैविके
- जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके
- वनस्पती अर्कजन्य उत्पादने
- जिवाणूजन्य उत्पादने

- चिकट सापाळे, काम गंध सापाळे, प्रकाश सापाळे इ.
- मित्र किडी
- सरळ वाण बियाणे
- नैसर्गिक sticker,sp reader इ.
- शेती विषयक पुस्तके
- spray pump, gloves, शेती उपकरणे इ.

## KrishiKatta Franchise

| FRANCHISE MODEL | FRANCHISE OPERATED |
|---|---|
| Shop Area | 250- 300 Sq. Ft. |
| Investment (INR) | 2,50,000/- |
| Franchise Fees | 1,00,000/- (+ GST) |
| Advertising Expenses | 100,000/- (+ GST) |
| Procurement Cost | 7,50,000/- (+ GST) (Only FromKrishiKatta) |
| Profit Per Month (Expected) | 105,000/- |
| Royalty Fees | 10% |
| Franchise Term | Five Year |
| Licenses | Agri Shop Licence, Shop Act, GST, NPOP Etc |
| KrishiKendra (Timings) | 8.00 am TO 7.30 pm (365 Days) |

### STORE SETUP INVESTEMENT BREAKUP

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| Outlet Launch Expenses | 15,000.00 |
| Furniture, Fixture & Colouring etc. | 87,500.00 |
| Rack, Storing Equipments | 85,000.00 |
| IT Infrastructure, TV & Music System Etc. | 62,500.00 |
| Total | Rs2,50,000.00 |

### EARNINGS PER MONTH

| PARTICULARS | AMOUNT |
|---|---|
| Monthly Sales @ 12000/day X 30 days | 3,60,000.00 |
| Monthly Profit Margin | 90,000.00 |
| Monthly Operating Cost | 60,000.00 |
| Monthly GOP | 30,000.00 |
| ROI | 80% |

### Terms and Conditions:

1. Once Franchise holder agreed for franchise then need to pay Rs 1,00,000 + 18000 GST for booking amount.
2. 100% Procurement from KrishiKatta Agri Services LLP only.
3. Liasoning Charges: FSSAI, GST, Organic Certification, Rent Agreement etc charges will be as per local governing body.


कृषी कट्टा
An Initiative by the:
MahaOrganic Farmer Producer Company

**Office:** Office No 13, ‘B’ Building, Anandmayi Apt, Karve Road, Pune - 411004, MH, India

**Contact No:** +91-7755933880 | +91-9922488750

info@krishikatta.com www.krishikatta.com